# देहू नगरपंचायत, देहू

## विशेष सभा

विषय पत्रिका पोच

सभा दि. ११/०३/२०२४ वार : सोमवार

| अ.क्र. | नाव | सही |
|---|---|---|
| १. | पूजा अमोल दिवटे ( नगराध्यक्षा) | |
| २. | सुधीर सुरेश काळोखे ( उपनगराध्यक्ष) | 8 PM 20 |
| ३. | योगेश बाळासाहेब परंडवाल | 8.17 |
| ४. | मीना राहुल कुन्हाडे | 8:3 7/3/24 |
| ५. | रसिका स्वप्रिल काळोखे | R S KALOKHE |
| ६. | मयूर दत्तात्रय शिवशरण | |
| ७. | शितल अनिल हगवणे | |
| ८. | पूनम विशाल काळोखे | 7:30pm |
| ९. | योगेश हनुमंत काळोखे | 7.20 pm |
| १०. | पूजा सुमित काळोखे | 7/3/24 |
| ११. | स्मिता शैलेश चव्हाण | 7:57 7/3/24 |
| १२. | पौर्णिमा विशाल परदेशी | |
| १३. | सपना जयेश मोरे | |
| १४. | प्रियांका अभिजित मोरे | |
| १५. | प्रविण रामदास काळोखे | |
| १६. | आदित्य चिंतामण टिळेकर | |
| १७. | ज्योती गोविंद टिळेकर | |
| १८. | सचिन संभाजी साळुंखे | |
| १९. | प्रदिप मनोहर परंडवाल | 7/3/2024 8:45 PM |

Scanned with OKEN Scanner

# देहू नगरपंचायत कार्यालय ता.हवेली, जि.पुणे

Email: vdodehu@gmail.com

जा.क्र आस्था/१६२७/२०२३-२४

दि.०७/०३/२०२४

विशेष सभा

नमुना 'अ' (नियम ३ पहा)

यादवारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची विशेष सभा वार सोमवार दिनांक ११/०३/२०२४ रोजी दुपारी १२:३० वाजता नगरपंचायत कार्यालयात जोडपत्रात नमूद केलेले कामकाज चालवण्यासाठी बोलवण्यात येत आहे. तरी सर्व सदस्यांनी उपस्थित राहावे हि विंनती.

नमूद 'अ' चे जोडपत्र देहू नगरपंचायतीची शुक्रवार दिनांक ११/०३/२०२४ रोजीचे सभेपुढील चालवायचे कामकाजबाबात सभेपुढील विषय.

1) तिर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत श्रीक्षेत्र देहू पाणीपुरवठा योजनेसाठी मौजे माळीनगर, ता.हवेली, जि.पुणे येथील सर्व्हे क्र. ११० व १०५ मधील जलशुध्दीकरण केंद्राच्या जागेचे भूसंपादन करणे व त्यासाठी येणा-या अनुषंगिक खर्चास मंजूरी देणेबाबत.

2) देहू नगरपंचायत हद्दीतील मौजे देहू मधील सर्व्हे क्र. ४४,४५,४६,५२,५३ व मौजे विठ्ठलनगर मधील ८५,८६,८७ मधून जाणा-या २४ मी. रूंदीचे प्रादेशिक नकाशातील रस्त्याबाबत.

3) देहू नगरपंचायत हद्दीतील दिव्यांग बांधवांना मालमत्ता करातून ५०% घरपट्टी माफ करणे, आर्थिक वर्ष २०२३-२४ चा ५% दिव्यांग निधी वाटप करणे अथवा साहित्य देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

देहू नगरपंचायत ... हवेली, जि. पुणे

सौ.पूजा दिवटे

नगराध्यक्षा

देहू नगरपंचायत, देहू

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे

सभा विभाग

विशेष सभा/इतिवृत्त/२३-२४ ठराव क्र. ०१

दि.११/०३/२०२४

विषय :- तिर्थक्षेत्र विकास आराखडया अंतर्गत श्री. क्षेत्र देहू पाणी पुरवठा योजने साठी मौजे माळीनगर ता. हवेली, जिल्हा- पुणे येथील सर्व्हे क्र.११० व १०५ मधील जलशुध्दीकरण केंद्राच्या जागेचे भूसंपादन करणे व त्यासाठी येणाऱ्या अनुषंगिक खर्चास मंजुरी देणेबाबत.

संदर्भ :- १.मे. उच्च न्यायालय, मुंबई यांचे रिट पिटीशन १०६६९/२०१७ बाबतचे दि.०७/०९/२०१८ रोजीचे आदेश.

२. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. एलक्यूएन००१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२ दि. २५.०१.२०१७

३. रिव्यू पिटीशन क्र. २५१३२/२०१९ बाबतचे दि.१८.११.२०२२. चे आदेश

४. कन्टेम्प्ट पिटीशन क. ४९३/२०१९

५. मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे आदेश क्र. पीएलसी/कावि/७८/२०२० दि.२४.०२.२०२०,

६. मा. उपविभागीय अभियंता, मजीप्रा, उपविभाग क्र. ३, पुणे-२ यांचे पत्र जा.क्र.१३७ दि. १३.०२.२०२४

७ . देहू नगरपंचायत कार्यालयाचे पत्र जा.क्र. नगररचना १५५६ दि.२८.०२.२०२४

८. कार्यकारी अभियंता, मजीप्रा विभाग के २. पुणे-६ यांचे पत्र जा.क्र.८९३/२०२४ दि.०१.०३.२०२४

९. मा. उपविभागीय अभियंता, मजीप्रा, उपविभाग क्र. ३, पुणे-२ बांचे पत्र जा.क्र.१९५/२०२४ दि.०१.०३.२०२४

ठराव-श्री. क्षेत्र देहू पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती १९६७ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा) मार्फत करण्यात येत होती मौजे बोडके वाडी (देहू) येथे सन १९६७ मध्ये सदर योजने अंतर्गत जॅकवेल व जलशुध्दीकरण केंद्र बाधण्यात आलेले आहे. सदर जॅकवेल व जलशुध्दीकरण केंद्राची जागा सन १९६७ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात होती.

सन २०१० मध्ये तिर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत श्री. क्षेत्र देहू पाणी पुरवठा योजना मंजूर झाली.सदर योजनेतील जलशुध्दीकरण केंद्र मौजे बोडकेवाडी येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात असलेल्या जागेत बांधणे प्रस्तावित होते. परंतू प्रत्यक्ष जलशुध्दीकरण केंद्राचे काम सुरू झाल्या नंतर स्थानिक शेतक-यांनी सदरचे काम स्थगित केले व सदर जागेच्या ७/१२ उताऱ्यावर स्थानिक शेतकऱ्यांची नावे असल्याने सदर जागा खासगी मालकीची असून सदर जागेचा मोबदला देण्याची मागणी केली. त्याअनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत ही सदरची जागा १९६७ साला पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात असल्याने सदर जागेच्या ७/१२ उताऱ्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची नोंद करण्याची मागणी उपविभागीय अधिकारी तथा प्रांत हवेली यांच्या कार्यालयास करण्यात आली. त्यानुसार सदर जागेच्या ७/१२ उताऱ्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची नोंद घेण्यात आली, त्यामुळे संबंधीत शेतकऱ्यांनी सदर निर्णया विरुध्द उपरोक्त संदर्भ क्र.०१ नुसार मा उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पीटीशन दाखल केली. सदर रिट पीटीशन वर दि. ०७.०९.२०१८ रोजी मा उच्च न्यायालय, मुंबई येथे सुनावणी होऊन सदर जागे संदर्भात निर्देश प्राप्त झाले. त्यानुसार सदरची जागा तीन महिन्याच्या आत पुर्ववत स्थितीत संबंधीत जागा मालकांना हस्तांतरीत करावी अथवा तीन महिन्याच्या आत नविन भूसंपादन कायद्यानुसार भूसंपादन करण्याचे निर्देश मा. उच्च न्यायालयाने दिले.

तदनंतर उपरोक्त संदर्भ क्र.०३ अन्वये उपविभागीय अधिकारी तथा प्रांत हवेली यांचे मार्फत मा उच्च न्यायालय, मुंबई येथे सदर निर्णयाच्या अनुषंगाने रिव्यू पिटीशन दाखल करण्यात आली. तसेच सदर जागेचे तीन महिन्याच्या कालावधीत भूसंपादन न झाल्याने संबंधीत जागा मालकांमार्फतही संदर्भ क्र.०४ नुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे कन्टेम्प्ट पिटीशन दाखल करण्यात आली. दरम्यान दि. १८.११.२०२२ च्या मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशा नुसार सदर रिव्यू पिटीशन फेटाळण्यात आली त्यामुळे सदर जागेचे भूसंपादन अद्याप न केल्याने मा उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. २१.०३.२०२४ रोजी स्वतः समक्ष उपस्थित रहाण्याचे निर्देश महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना दिलेले आहेत.

Scanned with OKEN Scanner

सद्यस्थितीत नगरपंचायती मार्फत सदर योजनेची देखभाल दुरुस्ती करण्यात येत असून सदर योजनेचे लाभा नगरपंचायत कार्यक्षेत्रातील असल्याने सदर जागेच्या भूसंपादनाचा प्रस्ताव नगरपंचायत देहू कार्यालया मार्फत तत्काळ करणे आवश्यक आहे, अन्यथा मा उच्च न्यायालय, मुंबई यांचे निर्देशानुसार सदरची जागा संबंधीत जागा मालक यांना करावी लागेल.

सदर जागा हि भूसंपादन करून ताब्यात घ्यावयाची असून मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचे संदर्भ क्र.०५ चे आदेशान्वये यापूर्वी सुरु केलेली भूसंपादनाची कार्यवाही रद्द करणेत आलेली आहे.

यावेळी देहू नगरपंचायतीची आर्थिक स्थिती पाहता वरील संदर्भ क्र.०७ नुसार उपविभागीय अभियंता, माजीप्रा व कार्यकारी अभियंता, मजीप्रा यांना यापूर्वीची भूसंपादनाची कार्यवाही त्यांचे कार्यालयामार्फत सुरु केले होती याकरिता सदर भूसंपादनाकरिता निधी त्यांचे कार्यालयामार्फत पुरविणेकामी विचारणा केली असता वरील संदर्भ क्र.०८ व ०९ नुसार सदर भूसंपादनाची यापूर्वीची कार्यवाही तीर्थक्षेत्र विकास आराखड्य अंतर्गत झालेली असल्याने त्यांनी सदर भूसंपादनाकरिता तीर्थक्षेत्र विकास आराखडा मधून निधी उपलब्ध करून घेणेत यावा असे कळविले आहे.

तरी देहू नगरपंचायत हद्दीतील मौजे माळीनगर मधील सर्व्हे क्र. ११० व १०५ मधील एकूण ५८००.०० चौ.मी. जागेचे भूसंपादन करावयाचे असून सदर भूसंपादन, जागेची मोजणी करणे तसेच इतर अनुषंगिक खर्चाकामी मान्यता मिळणेकरिता मे. सभेपुढे विचार विनिमय करून निर्णय घेणेकरिता विषय ठेवणेत आलेला होता.

यावेळी सदरचे कार्यालयीन टिपण्णीची सभेत वाचनाने नोंद घेणेत आली. सदरची पाणी पुरवठा योजना व शुद्धीकरण प्रकल्प याची देहू नगरपंचायत हद्दीतील नागरिकांना नितांत आवश्यकता असून सदरची जागा भूसंपादित केली नाही व संबंधित जागा मालक यांना परत केल्यास मोठ्या अडचणी व पाणी विषयक समस्यांना सामोरे जावे लागणार आहे असे सभेचे मत झाले. त्यामुळे सभेने सदरची जागा मे. उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे संपादित करण्यास व जागा मालक यांना लवकरात लवकर भूसंपादन करून भरपाई देण्यास सभेने मंजुरी दिली.यावेळी भूसंपादनाकरिता शासनामार्फत तीर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत अथवा अन्य निधी मधून निधी उपलब्ध करून घ्यावा तसेच सदर भूसंपादना करिता येणाऱ्या मोजणी व इतर अनुषंगिक खर्चास सभेने मंजुरी दिली.

सुचक:- श्री.योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक:- श्री.सुधीर सुरेश काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगरपंचायत स्थापना सन २०२० हवेली, जि. पुणे

P. Dirale
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे
सभा विभाग
विशेष सभा/इतिवृत्त/२३-२४ ठराव क्र. ०२
दि.११/०३/२०२४

विषय- देहू नगरपंचायत हद्दीतील मौजे देहू मधील सर्व्हे क्र. ४४,४५,४६,५२,५३ व मौजे विठ्ठलनगर मधील ८५,८६,८७ मधून जाणाऱ्या २४ मी रुंदीचे प्रादेशिक नकाशातील रस्त्याबाबत.

संदर्भ :- नगरसेवक श्री योगेश हनुमंत काळोखे यांचा दि. ०५.०३.२०२४ रोजीचा अर्ज.

ठराव- देहू नगरपंचायत ची स्थापना महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.एमयूपी-२०१७/प्र.क्र.१४/नवि१८ दि.०८.१२.२०२० नुसार झालेली आहे. देहू शहराची सद्य स्थिती मध्ये विकास योजना तयार करणेत आलेली नाही त्यामुळे शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय कमांक टी. पी. एस./१८९५/२२७- प्र. क्र. २६/२५/ न.वि.१३ दि. २५/११/१९९७ अन्वये मंजुर व दि. १०/०२/१९९८ पासून अंमलात आलेली अंतिम पुणे प्रादेशिक योजना (मंजुर) नुसार देहू नगरपंचायत हद्दीमध्ये विकास कामकाज चालते.

पुणे जिल्हा मंजूर प्रादेशिक योजना नकाशा व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण प्रारूप नकाशा यामध्ये दर्शविले नुसार देहू नगरपंचायत हद्दीतील मौजे देहू मधील सर्व्हे क्र.४४,४५,४६,५२,५३ व मौजे विठ्ठलनगर मधील ८५,८६,८७ मधून २४ मी. रुदीचा प्रादेशिक योजना रस्ता जात आहे.

वरील संदर्भीय अर्जान्व्ये पुढील प्रमाणे विनंती केलेली आहे. सदर रस्त्याचे क्षेत्रात अनेक भागात अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. त्यामुळे सदर २४ मी रुंदीचा प्रादेशिक योजना नकशातील रस्त्याची आखणी बदलून तो शेजारील भूधारकांची संमती असल्याने तो शेजारील जागेतून विकसित करावा व त्याची रुंदी २४ मी वरून १२ मी. करणेत यावी. तसेच त्या रस्त्याचे TDR अथवा भूसंपादन पद्धतीने जागा मालकांना भरपाई देण्यात यावी.

यावेळी सभेमध्ये सदर संदर्भीय अर्ज व प्रादेशिक नकाशा यांचे अवलोकन करून त्यावर चर्चा करणेत आली.यावेळी देहू नगरपंचायत हद्दीतील मौजे देहू मधील सर्व्हे क्र. ४४,४५,४६,५२,५३ व मौजे विठ्ठलनगर सर्व्हे क्र.८५,८६,८७ मधून जाणाऱ्या २४ मी रुंदीचे प्रादेशिक नकाशातील रस्त्याची रुंदी २४ मी वरून १२ मी करणे तसेच रस्त्याची आखणी शेजारील भूधारकांचे संमतीने बदलणेस सभेने मंजुरी दिली.तसेच सदर रस्त्याची आखणी बदलणे व त्याची रुंदी कमी करणे याकामी आवश्यक मंजुरी घेणेत याव्यात व मंजुरी मिळालेनंतर भूसंपादन अथवा TDR स्वरुपात सदर जागा अधिग्रहण करणेकामी भरपाई देणेत यावी असे ठरले. यावेळी एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मधील ३.११ नुसार पुढील कार्यवाही करणेस सभेने मंजुरी दिली.

तसेच याकामी मोजणी,खाजगी अभियंता मार्फत आवश्यक भाग नकाशे तयार करणे व इतर अनुषंगिक खर्चा करिता सभेमार्फत मंजुरी देण्यात आली.

सुचक:- श्री.योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक:- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल

ठराव सर्वानुमते मंजूर

Pohale.
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

नगरपंचायत स्थापना २०२० जि. पुणे

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत

विशेष सभा

विषय क्रमांक ०३

ठराव क्रमाक -०३ दिनांक -११/०३/२०२४

विषय : देहू नगरपंचायत हद्दीतील दिव्यांग बांधवांना घरपट्टी करातून ५०% घरपट्टी माफ करणे व आर्थिक वर्ष २०२३-२४ चा ५% दिव्यांग निधी वाटप करणे बाबत विचार विनीयम करणे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, देहू शहरात सध्यास्थितीत एकुण ११२ दिव्यांग बांधवांची नोंद आहे.या सर्व दिव्यांगाना नगरपंचायत मार्फत अर्थिक उत्पन्नाच्या ५% निधी दरवर्षी वाटप करण्याची तरतुद आहे.त्या अनुषंगाने अर्थिक वर्ष २०२३-२४ करीता एकुण ११२ दिव्यांगाना ४०००/- रुपये प्रमाणे ४,४८,०००/- रुपये निधी वाटप करण्यात आलेला आहे. तसेच शहरातील दिव्यांग बांधवाकडुन वेळोवेळी साहित्य मिळण्यासाठी मा.मुख्याधिकारी सो.नगरपंचायत देहू यांच्या कडे मागणी करण्यात येत आहे.त्याअनुषंगाने शहरातील दिव्यांग बांधवांशी चर्चा करुन दिव्यांगत्वा नुसार त्यांना जरुरी असलेल्या साहित्याची वाटप केल्यास दिव्यांग बांधवाच्या दृष्टीने हिताचे ठरेल.

शहरातील दिव्यांग बांधवाकडून वेळोवेळी घर पट्टीतून ५०% कर माफी मिळवण्याबाबत मागणी करण्यात येते.सदर घर पट्टीतून ५०% कर माफी मिळवण्याबाबत तरतुदी या ग्रामपंचायतीसाठी लागू आहेत. नगर विकास विभागामार्फत याबाबत तरतुदी करण्यात आलेल्या नाहीत.त्यानुसार शहरातील दिव्यांगाना विशेष बाब म्हणून सरसकट ५०% घरपट्टीतून माफी देणे उचित ठरणार नाही,त्याकरीता नगरपंचायत स्तरावर दिव्यंगाना घर पट्टी माफी निकष ठरवून जे दिव्यांग बांधव या निकषात पात्र ठरतील अशा दिव्यांग बांधवाना घर पट्टीतून ५०% सुट देणे अनुषंगीक ठरेल.

पात्रता निकष

१.घरपट्टीतून माफी फक्त नगरपंचायत हद्दितील एका निवासी मालमत्ता पुरती मर्यादीत राहील.

२.घरपट्टी माफी करीता घर स्वत:दिव्यांगाच्या नावाने असणे आवश्यक आहे .

३.जे दिव्यांग पुर्नत:पालकंवर अवलुंबुन असतील व दिव्यंगत्वा 50 % हुन अधिक असेल अश्या प्रकरणाम पलकांच्या एका निवसी मालमत्तेला 50 % घरपट्टी भरण्यातुन सवलत दिली जाईल.

४. दिव्यांगाना ५०% घरपट्टी माफ सवलत 2023-24 पासून लागू राहील.

५.मागील थकबाकीचा भरणा केल्याशिवाय या सवलतीचा लाभ घेता येणार नाही.

वरील बाबींचा विचार करता हि सभा सर्वनुमते असे ठरविते कि,वरील निकषा मध्ये पात्र ठरणा दिव्यांगाना ५०% घरपट्टी माफी मंजुर करण्यात येत आहे .

Scanned with OKEN Scanner

(6)

सूचक : सौ रसिका स्वप्निल काळोखे

अनुमोदक: सौ पूनम विशाल काळोखे

<u>ठराव सर्वानुमते मंजूर</u>

देहू नगरपंचायत ★ स्थापना सन २०२० ★ ता. हवेली, जि. पुणे

सौ पूजा अमोल दिवटे
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

# देहू नगरपंचायत कार्यालय ता.हवेली, जि.पुणे

Email: vdodehu@gmail.com

जा.क्र आस्था/१६२७/२०२३-२४ दि.०७/०३/२०२४

विशेष सभा

नमुना 'अ' (नियम ३ पहा)

याद्वारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची विशेष सभा वार सोमवार दिनांक ११/०३/२०२४ रोजी दुपारी १२:३० वाजता नगरपंचायत कार्यालयात जोडपत्रात नमूद केलेले कामकाज चालवण्यासाठी बोलवण्यात येत आहे. तरी सर्व सदस्यांनी उपस्थित राहावे हि विंनती.

नमूद 'अ' चे जोडपत्र देहू नगरपंचायतीची शुक्रवार दिनांक ११/०३/२०२४ रोजीचे सभेपुढील चालवायचे कामकाजबाबात सभेपुढील विषय.

1) तिर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत श्रीक्षेत्र देहू पाणीपुरवठा योजनेसाठी मौजे माळीनगर, ता.हवेली, जि.पुणे येथील सर्व्हे क्र. ११० व १०५ मधील जलशुध्दीकरण केंद्राच्या जागेचे भूसंपादन करणे व त्यासाठी येणा-या अनुषंगिक खर्चास मंजूरी देणेबाबत.

2) देहू नगरपंचायत हद्दीतील मौजे देहू मधील सर्व्हे क्र. ४४,४५,४६,५२,५३ व मौजे विठ्ठलनगर मधील ८५,८६,८७ मधून जाणा-या २४ मी. रूंदीचे प्रादेशिक नकाशातील रस्त्याबाबत.

3) देहू नगरपंचायत हद्दीतील दिव्यांग बांधवांना मालमत्ता करातून ५०% घरपट्टी माफ करणे, आर्थिक वर्ष २०२३-२४ चा ५% दिव्यांग निधी वाटप करणे अथवा साहित्य देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

देहू नगरपंचायत ... हवेली, जि. पुणे (स्थापना सन २०२०)

सौ.पूजा दिवटे

नगराध्यक्षा

देहू नगरपंचायत, देहू

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत, देहू जि पुणे

सभा विभाग

विशेष सभा/इतिवृत्त/२३.२४ ठराव क्र. ८१

दि.११/०३/२०२४

विषय :- तिर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत श्री. क्षेत्र देहू पाणी पुरवठा योजने साठी मौजे भाळीनगर ता. हवेली, जिल्हा पुणे येथील सर्व्हे क्र.११० व १०५ मधील जलशुध्दीकरण केंद्राच्या जागेचे भूसंपादन करणे व त्यासाठी येणाऱ्या अनुषंगिक खर्चास मंजुरी देणेबाबत.

संदर्भ :- १.मे. उच्च न्यायालय, मुंबई यांचे रिट पिटीशन १०६६९/२०१७ बाबतचे दि.०७/०९/२०१८ रोजीचे आदेश

२. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. एलक्यूएन००१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२ दि. २५.०१.२०१७

३. रिव्यू पिटीशन क्र. २५१३२/२०१९ बाबतचे दि.१८.११.२०२२. चे आदेश

४. कन्टेम्प्ट पिटीशन क, ४९३/२०१९

५. मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे आदेश क्र. पीएलसी/कावि/७८/२०२० दि.२४.०२.२०२०.

६. मा. उपविभागीय अभियंता, मजीप्रा, उपविभाग क्र. ३, पुणे-२ यांचे पत्र जा.क्र.१३७ दि. १३.०२.२०२४

७ . देहू नगरपंचायत कार्यालयाचे पत्र जा.क्र. नगररचना १५५६ दि.२८.०२.२०२४

८. कार्यकारी अभियंता, मजीप्रा विभाग के २. पुणे-६ यांचे पत्र जा.क्र.८९३/२०२४ दि.०१.०३.२०२४

९. मा. उपविभागीय अभियंता, मजीप्रा, उपविभाग क्र. ३, पुणे-२ बांचे पत्र जा.क्र.१९५/२०२४ दि.०१.०३.२०२४

ठराव-श्री. क्षेत्र देहू पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती १९६७ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा) मार्फत करण्यात येत होती मौजे बोडके वाडी (देहू) येथे सन १९६७ मध्ये सदर योजने अंतर्गत जॅकवेल व जलशुध्दीकरण केंद्र बाधण्यात आलेले आहे. सदर जॅकवेल व जलशुध्दीकरण केंद्राची जागा सन १९६७ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात होती.

सन २०१० मध्ये तिर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत श्री. क्षेत्र देहू पाणी पुरवठा योजना मंजूर झाली.सदर योजनेतील जलशुध्दीकरण केंद्र मौजे बोडकेवाडी येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात असलेल्या जागेत बांधणे प्रस्तावित होते. परंतू प्रत्यक्ष जलशुध्दीकरण केंद्राचे काम सुरू झाल्या नंतर स्थानिक शेतक-यांनी सदरचे काम स्थगित केले व सदर जागेच्या ७/१२ उताऱ्यावर स्थानिक शेतकऱ्यांची नावे असल्याने सदर जागा खासगी मालकीची असून सदर जागेचा मोबदला देण्याची मागणी केली. त्याअनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत ही सदरची जागा १९६७ साला पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात असल्याने सदर जागेच्या ७/१२ उताऱ्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची नोंद करण्याची मागणी उपविभागीय अधिकारी तथा प्रांत हवेली यांच्या कार्यालयास करण्यात आली. त्यानुसार सदर जागेच्या ७/१२ उताऱ्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची नोंद घेण्यात आली, त्यामुळे संबंधीत शेतकऱ्यांनी सदर निर्णया विरुध्द उपरोक्त संदर्भ क्र.०१ नुसार मा उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पीटीशन दाखल केली. सदर रिट पीटीशन वर दि. ०७.०९.२०१८ रोजी मा उच्च न्यायालय, मुंबई येथे सुनावणी होऊन सदर जागे संदर्भात निर्देश प्राप्त झाले. त्यानुसार सदरची जागा तीन महिन्याच्या आत पुर्ववत स्थितीत संबंधीत जागा मालकांना हस्तांतरीत करावी अथवा तीन महिन्याच्या आत नविन भूसंपादन कायद्यानुसार भूसंपादन करण्याचे निर्देश मा. उच्च न्यायालयाने दिले.

तदनंतर उपरोक्त संदर्भ क्र.०३ अन्वये उपविभागीय अधिकारी तथा प्रांत हवेली यांचे मार्फत मा उच्च न्यायालय, मुंबई येथे सदर निर्णयाच्या अनुषंगाने रिव्यू पिटीशन दाखल करण्यात आली. तसेच सदर जागेचे तीन महिन्याच्या कालावधीत भूसंपादन न झाल्याने संबंधीत जागा मालकांमार्फतही संदर्भ क्र.०४ नुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे कन्टेम्प्ट पिटीशन दाखल करण्यात आली. दरम्यान दि. १८.११.२०२२ च्या मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशा नुसार सदर रिव्यू पिटीशन फेटाळण्यात आली त्यामुळे सदर जागेचे भूसंपादन अद्याप न केल्याने मा उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. २१.०३.२०२४ रोजी स्वतः समक्ष उपस्थित रहाण्याचे निर्देश महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना दिलेले आहेत.

Scanned with OKEN Scanner

सद्यस्थितीत नगरपंचायती मार्फत सदर योजनेची देखभाल दुरुस्ती करण्यात येत असून सदर योजनेचे ला नगरपंचायत कार्यक्षेत्रातील असल्याने सदर जागेच्या भूसंपादनाचा प्रस्ताव नगरपंचायत देहू कार्यालया मार्फत तत्का करणे आवश्यक आहे. अन्यथा मा उच्च न्यायालय, मुंबई यांचे निर्देशानुसार सदरची जागा संबंधीत जागा मालक यां करावी लागेल.

सदर जागा हि भूसंपादन करून ताब्यात घ्यावयाची असून मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचे संदर्भ क्र.०५ चे आदेशा यापूर्वी सुरु केलेली भूसंपादनाची कार्यवाही रद्द करणेत आलेली आहे.

यावेळी देहू नगरपंचायतीची आर्थिक स्थिती पाहता वरील संदर्भ क्र.०७ नुसार उपविभागीय अभियंता, माजीप्रा कार्यकारी अभियंता, मजीप्रा यांना यापूर्वीची भूसंपादनाची कार्यवाही त्यांचे कार्यालयामार्फत सुरु केले होती याकरिता स भूसंपादनाकरिता निधी त्यांचे कार्यालयामार्फत पुरविणेकामी विचारणा केली असता वरील संदर्भ क्र.०८ व ०९ नुसार स भूसंपादनाची यापूर्वीची कार्यवाही तीर्थक्षेत्र विकास आराखड्य अंतर्गत झालेली असल्याने त्यांनी सदर भूसंपादनाकरि तीर्थक्षेत्र विकास आराखडा मधून निधी उपलब्ध करून घेणेत यावा असे कळविले आहे.

तरी देहू नगरपंचायत हद्दीतील मौजे माळीनगर मधील सर्व्हे क्र. ११० व १०५ मधील एकूण ५८००.०० चौ.मी. जागे भूसंपादन करावयाचे असून सदर भूसंपादन, जागेची मोजणी करणे तसेच इतर अनुषंगिक खर्चाकामी मान्यता मिळणेकरिता सभेपुढे विचार विनिमय करून निर्णय घेणेकरिता विषय ठेवणेत आलेला होता.

यावेळी सदरचे कार्यालयीन टिपणीची सभेत वाचनाने नोंद घेणेत आली. सदरची पाणी पुरवठा योजना व शुद्धीकरण प्रकल्प याची देहू नगरपंचायत हद्दीतील नागरिकांना नितांत आवश्यकता असून सदरची जागा भूसंपादित केली नाही व संबंधित जागा मालक यांना परत केल्यास मोठ्या अडचणी व पाणी विषयक समस्यांना सामोरे जावे लागणार आहे असे सभेचे मत झाले. त्यामुळे सभेने सदरची जागा मे. उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे संपादित करण्यास व जागा मालक यांना लवकरात लवकर भूसंपादन करून भरपाई देण्यास सभेने मंजुरी दिली.यावेळी भूसंपादनाकरिता शासनामार्फत तीर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत अथवा अन्य निधी मधून निधी उपलब्ध करून घ्यावा तसेच सदर भूसंपादना करिता येणाऱ्या मोजणी व इतर अनुषंगिक खर्चास सभेने मंजुरी दिली.

सुचक:- श्री.योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक:- श्री.सुधीर सुरेश काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

P.Dirale
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे
सभा विभाग
विशेष सभा/इतिवृत्त/२३-२४ ठराव क्र. ०२
दि.११/०३/२०२४

विषय- देहू नगरपंचायत हद्दीतील मौजे देहू मधील सर्व्हे क्र. ४४,४५,४६,५२,५३ व मौजे विठ्ठलनगर मधील ८५,८६,८७ मधून जाणाऱ्या २४ मी रुंदीचे प्रादेशिक नकाशातील रस्त्याबाबत.

संदर्भ :- नगरसेवक श्री योगेश हनुमंत काळोखे यांचा दि. ०५.०३.२०२४ रोजीचा अर्ज.

ठराव- देहू नगरपंचायत ची स्थापना महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.एमयूपी-२०१७/प्र.क्र.१४/नवि१८ दि.०८.१२.२०२० नुसार झालेली आहे. देहू शहराची सद्य स्थिती मध्ये विकास योजना तयार करणेत आलेली नाही त्यामुळे शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय कमांक टी. पी. एस./१८९५/२२७- प्र. क्र. २६/२५/ न.वि.१३ दि. २५/११/१९९७ अन्वये मंजुर व दि. १०/०२/१९९८ पासून अंमलात आलेली अंतिम पुणे प्रादेशिक योजना (मंजुर) नुसार देहू नगरपंचायत हद्दीमध्ये विकास कामकाज चालते.

पुणे जिल्हा मंजूर प्रादेशिक योजना नकाशा व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण प्रारूप नकाशा यामध्ये दर्शविले नुसार देहू नगरपंचायत हद्दीतील मौजे देहू मधील सर्व्हे क्र.४४,४५,४६,५२,५३ व मौजे विठ्ठलनगर मधील ८५,८६,८७ मधून २४ मी. रुदीचा प्रादेशिक योजना रस्ता जात आहे.

वरील संदर्भीय अर्जान्व्ये पुढील प्रमाणे विनंती केलेली आहे. सदर रस्त्याचे क्षेत्रात अनेक भागात अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. त्यामुळे सदर २४ मी रुंदीचा प्रादेशिक योजना नकशातील रस्त्याची आखणी बदलून तो शेजारील भूधारकांची संमती असल्याने तो शेजारील जागेतून विकसित करावा व त्याची रुंदी २४ मी वरून १२ मी. करणेत यावी. तसेच त्या रस्त्याचे TDR अथवा भूसंपादन पद्धतीने जागा मालकांना भरपाई देण्यात यावी.

यावेळी सभेमध्ये सदर संदर्भीय अर्ज व प्रादेशिक नकाशा यांचे अवलोकन करून त्यावर चर्चा करणेत आली.यावेळी देहू नगरपंचायत हद्दीतील मौजे देहू मधील सर्व्हे क्र. ४४,४५,४६,५२,५३ व मौजे विठ्ठलनगर सर्व्हे क्र.८५,८६,८७ मधून जाणाऱ्या २४ मी रुंदीचे प्रादेशिक नकाशातील रस्त्याची रुंदी २४ मी वरून १२ मी करणे तसेच रस्त्याची आखणी शेजारील भूधारकांचे संमतीने बदलणेस सभेने मंजुरी दिली.तसेच सदर रस्त्याची आखणी बदलणे व त्याची रुंदी कमी करणे याकामी आवश्यक मंजुरी घेणेत याव्यात व मंजुरी मिळालेनंतर भूसंपादन अथवा TDR स्वरुपात सदर जागा अधिग्रहण करणेकामी भरपाई देणेत यावी असे ठरले. यावेळी एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मधील ३.११ नुसार पुढील कार्यवाही करणेस सभेने मंजुरी दिली.

तसेच याकामी मोजणी,खाजगी अभियंता मार्फत आवश्यक भाग नकाशे तयार करणे व इतर अनुषंगिक खर्चा करिता सभेमार्फत मंजुरी देण्यात आली.

सुचक:- श्री.योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक:- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल

ठराव सर्वानुमते मंजूर

Pawar.
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

नगरपंचायत ★ हवेली, जि. पुणे ★ स्थापना २०२०

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत

विशेष सभा

विषय क्रमांक ०३

ठराव क्रमांक -०३ दिनांक -११/०३/२०२४

विषय : देहू नगरपंचायत हद्दीतील दिव्यांग बांधवांना घरपट्टी करातून ५०% घरपट्टी माफ करणे व आर्थिक वर्ष २०२३-२४ चा ५% दिव्यांग निधी वाटप करणे बाबत विचार विनीमय करणे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, देहू शहरात सद्यास्थितीत एकुण ११२ दिव्यांग बांधवांची नोंद आहे.या सर्व दिव्यांगाना नगरपंचायत मार्फत अर्थिक उत्पन्नाच्या ५% निधी दरवर्षी वाटप करण्याची तरतुद आहे.त्या अनुषंगाने अर्थिक वर्ष २०२३-२४ करीता एकुण ११२ दिव्यांगाना ४०००/- रुपये प्रमाणे ४,४८,०००/- रुपये निधी वाटप करण्यात आलेला आहे. तसेच शहरातील दिव्यांग बांधवाकडुन वेळोवेळी साहित्य मिळण्यासाठी मा.मुख्याधिकारी सो.नगरपंचायत देहू यांच्या कडे मागणी करण्यात येत आहे.त्याअनुषंगाने शहरातील दिव्यांग बांधवांशी चर्चा करुन दिव्यांगत्वा नुसार त्यांना जरुरी असलेल्या साहित्याची वाटप केल्यास दिव्यांग बांधवाच्या दृष्टीने हिताचे ठरेल.

शहरातील दिव्यांग बांधवाकडून वेळोवेळी घर पट्टीतून ५०% कर माफी मिळवण्याबाबत मागणी करण्यात येते.सदर घर पट्टीतून ५०% कर माफी मिळवण्याबाबत तरतुदी या ग्रामपंचायतीसाठी लागू आहेत. नगर विकास विभागामार्फत याबाबत तरतुदी करण्यात आलेल्या नाहीत.त्यानुसार शहरातील दिव्यांगाना विशेष बाब म्हणून सरसकट ५०% घरपट्टीतून माफी देणे उचित ठरणार नाही,त्याकरीता नगरपंचायत स्तरावर दिव्यंगाना घर पट्टी माफी निकष ठरवून जे दिव्यांग बांधव या निकषात पात्र ठरतील अशा दिव्यांग बांधवाना घर पट्टीतून ५०% सुट देणे अनुषंगीक ठरेल.

**पात्रता निकष**

१.घरपट्टीतून माफी फक्त नगरपंचायत हद्दितील एका निवासी मालमत्ता पुरती मर्यादीत राहील.

२.घरपट्टी माफी करीता घर स्वत:दिव्यांगाच्या नावाने असणे आवश्यक आहे .

३.जे दिव्यांग पुर्नत:पालकंवर अवलुंबुन असतील व दिव्यंगत्वा 50 % हुन अधिक असेल अश्या प्रकरणामधे पलकांच्या एका निवसी मालमत्तेला 50 % घरपट्टी भरण्यातुन सवलत दिली जाईल.

४. दिव्यांगाना ५०% घरपट्टी माफ सवलत 2023-24 पासून लागू राहील.

५.मागील थकबाकीचा भरणा केल्याशिवाय या सवलतीचा लाभ घेता येणार नाही.

वरील बाबींचा विचार करता हि सभा सर्वनुमते असे ठरविते कि,वरील निकषा मध्ये पात्र ठरणाऱ्या दिव्यांगाना ५०% घरपट्टी माफी मंजुर करण्यात येत आहे .

Scanned with OKEN Scanner

सूचक : सौ रसिका स्वप्निल काळोखे

अनुमोदक: सौ पूनम विशाल काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

सौ पूजा अमोल दिवटे
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner